Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education.
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ.
स.न.८३२-ए,फायनल.प्लॉ.नं.१७८,१७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary (P) : 25651750 EPABX -25705000 Fax : 25665807
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.म./गणकयंत्र/ ११२/४३२०
पुणे-४११००४
दिनांक-२७.११.२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२६ माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) विद्यार्थ्यांचा APAAR ID नोंदवून घेणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) फेब्रुवारी-मार्च २०२६ ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना निकालाचे वेळी Digilocker मध्ये विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत. त्याकरीता विद्यार्थ्यांच्या APAAR ID ची नोंद आवश्यक आहे. APAAR ID द्वारे प्राप्त Digital गुणपत्रिकांचे विद्यार्थ्यांना होणारे लाभ पुढील प्रमाणे आहेत.

१.विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेचे कायमस्वरूपी Digital Record तयार होऊन सर्व शैक्षणिक गुणपत्रिका एकत्रित उपलब्ध होतात
२.वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशप्रक्रिया सुलभ होते. शैक्षणिक संस्था / नियोक्ते त्वरीत पात्रता पडताळणी करू शकतात. भौतिक कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाहीशी होते.
३. सरकारी शिष्यवृत्ती व योजनांमध्ये लाभ मिळणे सुलभ होते.
४. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी कोठूनही उपलब्ध होतात.
५. केंद्रीकृत आणि सुरक्षित प्रणालीमुळे कागदपत्रे हरवण्याचा धोका नाही

त्यामुळे आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यायातील जास्तीतजास्त विद्यार्थ्यांचा APAAR ID उपलब्ध करून त्याची नोंद मंडळाचे संकेतस्थळ www.mahahsscboard.in वर करणेबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाही करण्याबाबत अहवाल राज्य मंडळ कार्यालयास सादर करावा.

Digitally signed by
Dipak Ambadas Mali
Date: 06-12-2025
22:58:03
(दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४

पृष्ठांकन क्र.अविमं/उमाप/ ३०२२
दिनांक :- ०९.१२.२०२५

प्रति,

**प्राचार्य /मुख्याध्यापक**
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय:- :-फेब्रुवारी / मार्च 2026 माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10 वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)विदयार्थ्यांना APAAR ID नोंदवून घेणेबाबत..**

**संदर्भ:-** रा.मं.पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./गणकयंत्र/११२,/४३२० दिनांक २७/१२/२०२५.

उपरोक्त पत्राचे अवलोकन करण्यात येवून आवश्यक ती योग्य कार्यवाही करण्यात यावी.

S.V.Salunke 09.12.2025
(संगीता साळुंखे)
**विभागीय सहा.सचिव**
अमरावती विभागीय मंडळ अमरावती